**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

# शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता प्रस्तावित नविन महाविद्यालय, विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ व विद्याशाखावाढ तसेच सॅटलाईट केंद्रा बाबतचे प्रस्ताव सादर करणे संदर्भात निर्देश / सुचना :

१) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र दि. ०७ जानेवारी, २०२३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करीता नवीन महाविद्यालय/ नवीन परिसंस्था साठी एकुण ०८ स्थळ बिंदुना मान्यता देण्यात आलेली असून त्याची प्रत या सोबत जोडलेली आहे. त्यांनुसार नवीन महाविद्यालय / परिसंस्था या साठी दि. १५ जानेवारी, २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाची हार्डकॉपी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात दि. २० जानेवारी, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासनाने अध्यादेश १३ अन्वये निर्गमित केलेले अध्यादेश दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ प्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारित कलम १०९ पोट कलम ३ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ तसेच प्रस्तावित नविन महाविद्यालयाबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या बृहत आराखडयानुसार ऑनलाईनद्वारे **दिनांक १५ जानेवारी, २०२३ पर्यंत** प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.अर्जाची हार्डकॉपी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात दि. २० जानेवारी, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

३) प्रस्तुत प्रकरणी **अध्यादेश-१५१, १५२ व १५२A अन्वये** विहित केल्यानुसार सर्व संबंधित संस्था / महाविद्यालयांनी शुल्काचा भरणा ऑनलाईन करणे आवश्यक आहे व विहित केलेल्या प्रक्रियेनुसार चलन प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

४) नविन प्रस्तावित महाविद्यालयासाठी शासनाने विहित केलेला **परिशिष्ठ ''अ''** मध्ये प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून महानगरपालिका क्षेत्रामध्ये अद्ययावत इमारत व संपूर्ण भौतिक सुविधेसह अर्धा एकर महाविद्यालयाची जागा असणे आवश्यक आहे. नगरपालिका क्षेत्राअंतर्गत एक एकर व ग्रामपंचायत / ग्रामीण क्षेत्रासाठी तीन एकर जमिनीबाबत संस्थेच्या स्वत:च्या मालकीची किंवा अधिकृत रजिस्टर भाडेपट्टा प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या प्रस्तावासोबत **पारंपारिक महाविद्यालयासाठी रुपये ७ लाख व विधी महाविद्यालयासाठी रुपये १५ लाखाचे राष्ट्रीयकृत शेडयूल बँकेमध्ये किमान पाच वर्षासाठी विद्यापीठ व संस्थेच्या नावे संयुक्त मुदत ठेव (एफ.डी.) प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

६) मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयानुसार एकाच संस्थेचे विविध महाविद्यालय किंवा एकापेक्षा जास्त नविन प्रस्तावित महाविद्यालयासाठी संस्थेने अर्ज केल्यास

**महाविद्यालय निहाय मुद्दा क्र. (४) अन्वये विनिर्धिष्ठीत केल्यानुसार प्रस्तावासोबत स्वतंत्र एफ.डी. सादर करणे आवश्यक आहे.**

७) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ व शासन निर्णय दि. १५-०९-२०१७ अन्वये विहित केलेल्या भौतिक / पायाभूत सुविधा संबंधित नविन प्रस्तावित महाविद्यालयाकडे असणे आवश्यक आहे.

८) शासन निर्णय दिनांक १५-०९-२०१७ अन्वये विहित केल्यानुसार **अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाच्या संस्थेस नविन महाविद्यालयासाठी प्रस्ताव सादर करावयाचे असल्यास जून्या महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन /पुनर्रमुल्यांकन झाल्याशिवाय सर्व संबंधित संस्थेने नविन प्रस्तावित महाविद्यालयाचे प्रस्ताव ग्राहय धरण्यात येणार नाही.**

९) महाराष्ट्र शासनाने दिनांक ०७ जानेवारी, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मान्य केलेल्या बृहत आराखडयाप्रमाणे शहर / गाव निहाय निश्चित करण्यात आलेले बिंदू बृहत आराखडा तयार करतांना शासनाने निर्देशित केलेल्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करुन मंजूर स्थळ बिंदू सदरील बृहत आराखडयामध्ये कायम करणे किंवा वगळणे याबाबत विद्यापीठ प्राधीकरणाचा अंतिम निर्णय सर्व संबंधितांना लागू राहील तसेच उक्त प्रकरणी मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल झाल्यास तद्अनुषंगाने मा. न्यायालयाचा निर्णय सुध्दा सर्व संबंधितांना लागू राहील, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

१०) प्रस्तुत प्रकरणी एन.सी.टी.ई., ए.आय.सी.टी.ई., बार कॉन्सिल ऑफ इंडिया, कॉन्सिल ऑफ फार्मसी, कॉन्सिल ऑफ आर्किटेक्चर इत्यादी व तत्सम केंद्रीय प्राधीकरणाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी सदरील प्राधीकरणाची मान्यता असल्याशिवाजी सर्व संबंधित संस्थांना सदरील अभ्यासक्रमाचे महाविद्यालय सुरु करता येणार नाही तसेच बृहत आराखडयानुसार सर्व संबंधित संस्था / परिसंस्थांनी विद्यापीठास तसेच सदरील केंद्रीय प्राधीकरणास विहित केलेल्या नियमानुसार अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

११) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (क) व शासन निर्णय दि.१३-०९-२०१७ अन्वये विहित केल्यानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनी खालीलप्रमाणे विनिर्धिष्ठित करण्यात आलेल्या अटी / शर्तीनुसार विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ व विद्याशाखावाढ साठी प्रस्ताव प्रपत्र ``ब`` नुसार सादर करणे आवश्यक आहे.

a) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (६) अन्वये विहित केल्यानुसार विस्तारीकरणांअतर्गत वाढीव अभ्यासक्रमासाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन झाल्याशिवाय प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही तसेच सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे शिफारशित करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

b) शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित केल्यानुसार विस्तारीकरणाअंतर्गत महाविद्यालय निहाय स्वतंत्रपणे वाढीव अभ्यासक्रमासाठी रुपये ५ लाख, वाढीव विषयासाठी रुपये २ लाख, वाढीव विद्याशाखेसाठी रुपये ५ लाख व वाढीव तुकडीसाठी रुपये ३ लाखचे मुदत ठेव / एफ.डी. राष्ट्रीयकृत बँकेचे विद्यापीठ व संस्थेच्या संयुक्त नावे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

c) शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित केल्यानुसार संबंधित महाविद्यालयाकडे अद्ययावत इमारत, भौतिक पायाभूत सुविधा, नियमित प्राचार्यांची नियुक्ती,

नियमित अध्यापक व अध्यापिकेत्तर कर्मचाऱ्यासह संपूर्ण सुविधा संबंधित महाविद्यालयाकडे असणे आवश्यक आहे.

d) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ४ (क) व शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०२० अन्वये विहित केल्यानुसार **सॅटॅलाईट केंद्रासाठी परिशिष्ठ ``अ`` व ``ब`` नुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.**

e) सॅटॅलाईट केंद्रासाठी प्रस्ताव सादर केलेल्या संस्थेने मुळ महाविद्यालयापासून २०० कि.मी. त्रिजेच्या परिसरात व अपवादात्मक परिस्थितीमध्ये ३०० कि.मी. च्या परिघात प्रस्ताव सादर करण्यास अनुज्ञेय राहील.

f) सॅटॅलाईट केंद्रासाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थांनी सदरील शासन निर्णयामध्ये विहित केल्यानुसार रुपये ५ लाखाचा एफ.डी., स्वत:ची अर्धा एकर जागा किंवा अधिकृत भाडेपट्टा व किमान ३ हजार चौरस फुट इमारत बांधकाम बाबतचे दस्ताऐवज विविध भौतिक सुविधेसह अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाच्या बाबतीत जून्या महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन बाबतच्या दस्ताऐवजासह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

१२) विद्यापीठ अध्यादेश-१५१, १५२ व १५२A अन्वये विहित केल्यानुसार **सर्व संबंधित संस्थांनी नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या प्रस्तावासाठी तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांनी वाढीव अभ्यासक्रमासाठी प्रस्तावासोबत सादर केलेले प्रक्रिया शुल्क परत मिळणार नाही किंवा सदरील शुल्क ना परतावा असेल,** याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

१३) प्रस्तुत प्रकरणी बृहत आराखडा, सॅटॅलाईट केंद्र तसेच विस्तारीकरणाअंतर्गत वाढीव अभ्यासक्रमासाठी यापूढे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय सर्व संबंधितांना लागू राहील, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

१४) महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेला शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी निश्चित करण्यात आलेल्या **स्थळबिंदू बाहेरिल ठिकाणासाठी संस्था / परिसंस्थांकडून अर्ज स्विकारले जाणार नाही** किंवा **तद्अनुषंगाने महाराष्ट्र शासनाकडे प्रस्तावांची शिफारस करण्यात येणार नाही** तसेच तद्अनुषंगाने नियमबाहय प्रस्ताव सुध्दा स्विकारण्यात येणार नाही, याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

१४) ज्या संस्था / महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ बाबत या कार्यालयाचे पत्र दि.१२-०९-२०२२ अन्वये प्रस्ताव सादर केलेले आहे अश्या संस्था / महाविद्यालयांनी पुन्हा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

स्वाक्षरित/-

**कुलसचिव**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**

**औरंगाबाद.**